www.rajdand.com

सातारा गुरूवार
२९. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !

rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महत्त्वाचे

### सव्वा लाख लोकांची तहान टँकरच्या पाण्यावर

**सांगली :** थंडीचा हंगाम संपत आला असतानाच पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या असून जिल्ह्यातील जत व आटपाडी तालुक्यातील ६१ गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने बुधवारी देण्यात आली. या गावातील १ लाख २९ हजार ५५६ लोकांना आपली तहान टँकरच्या पाण्यावर भागावावी लागत आहे.जत तालुक्यात टंचाईग्रस्त गावांची संख्या ५८ तर आटपाडी तालुक्यात ४ आहे. सध्या जतमध्ये ५४ तर आटपाडी तालुक्यात ३ टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या दोन तालुक्यातील ६१ गावे आणि ४११ वाडी वस्तींना सध्या टँकरने पाणी पुरविण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासनाकडून संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा शासनाला सादर करण्यात आला असून यामध्ये विविध उपाय योजनांसाठी ३१ कोटी ४६ लाख रूपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. तसेच ताकारी, म्हैसाळ, टेंभू या सिंचन योजनांचे वीज वापराचे ४५ कोटींचे देयक टंचाई निधीतून देण्यात येणार आहे.टंचाईच्या झळा सुसह्य करण्यासाठी विविध उपाय योजनांचा आराखडा तयार करण्यात आला असून यामध्ये नवीन विंधन विहीर घेणे, तात्पुरत्या पूरक नळ योजनांना मान्यता देणे, विहीरींचे अधिग्रहण करणे आदी उपायांचा समावेश आहे.

# मोदींच्या हस्ते तामिळनाडूत १७,३०० कोटींच्या नव्या प्रकल्पांचे भूमिपूजन

## काँग्रेस आणि द्रमुकवर टीकास्त्र




**थुकुडी (तामिळनाडू) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) तामिळनाडूतील नवीन प्रक्षेपण केंद्रासह सुमारे १७ हजार ३०० कोटींच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले. पंतप्रधान मोदींनी येथून जवळच असलेल्या कुलसेकरापट्टिनम येथे 'इस्रो'च्या होत असलेल्या नव्या प्रक्षेपण केंद्राचे भूमिपूजन केले. यासाठी सुमारे ९८६ कोटी रुपये खर्च येणार आहे. हे प्रक्षेपण केंद्र पूर्ण झाल्यानंतर येथून दर वर्षी २४ प्रक्षेपकांचे-अवकाशयानांचे प्रक्षेपण शक्य होईल.

पंतप्रधानांनी थुथुकुडी येथे विविध प्रकल्पांचे उद्घाटन केले. आपल्या तामिळनाडूच्या दोन दिवसीय दौऱ्याची सांगता करण्यापूर्वी तिरुनेलवेली येथे भाजपच्या संबोधित करताना मोदींनी तामिळनाडूतील सत्ताधारी द्रविड मुनेत्र कळघमवर (डीएमके) कडाडून टीका केली आणि केंद्राच्या योजनांमध्ये सहकार्य न केल्याचा आरोप केला. अयोध्येतील श्रीराम मंदिरावरील चर्चेदरम्यान द्रमुकने संसदेतून सभात्याग केल्याची टीकाही मोदींनी केली. मोदी म्हणाले की, द्रमुकचे सभागृहातून असे पलायन जनतेच्या श्रद्धेविषयी द्रमुकला वाटत असलेला द्वेष दर्शवते. श्रीरामाशी तामिळनाडूचे संबंध सर्वश्रुत आहे. अयोध्येतील २२ जानेवारी रोजी राम मंदिर अभिषेक सोहळ्यापूर्वी, मी तामिळनाडूतील धनुषकोडीसह विविध मंदिरांना भेट दिली. एवढ्या वर्षांनी मंदिर बांधले जात असल्याने संपूर्ण देश आनंदी होता.

संसदेत जेव्हा यासंबंधीचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा द्रमुकचे खासदार पळून गेले.मोदींनी सांगितले, की द्रमुक आणि काँग्रेस समाजात फूट पाडण्याचे काम करत आहे. आम्ही मात्र सर्व समाजाला आमच्या एका कुटुंबाप्रमाणे मानतो. 'द्रमुककडून मर्यादा उल्लंघन!' द्रमुकवर टीका करताना मोदी म्हणाले, की या पक्षाने आता सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. तामिळनाडूतील इस्रो प्रक्षेपण केंद्राचे श्रेय घेण्यासाठी त्यांनी चीनचे 'स्टिकर' लावले. हा आपल्या देशाचा अपमान आहे, आपल्या देशभक्त अवकाश शास्त्रज्ञांचा अपमान आहे. तामिळनाडूचे लोक द्रमुकला याची नक्की शिक्षा देतील. भाजपच्या तामिळनाडू शाखेने आरोप केला, की, कुलसेकरापट्टिनम येथील 'इस्रो'च्या नवीन केंद्राचे श्रेय घेण्यासाठी द्रमुकने एका जाहिरातीत चिनी ध्वजह्न आणि चीनी भाषा वापरली आहे. हा संदर्भ घेत मोदींनी आरोप केला, की द्रमुक भारताच्या प्रगतीचे आणि अवकाश तंत्रज्ञानातील देशाच्या कामगिरीची प्रशंसा करायला तयार नाही. ही जाहिरात जनतेने भरलेल्या करातून दिली आहे. त्यात भारताच्या अवकाश क्षेत्रातील यशाचा उल्लेख नाही. त्यांना हे यश जगाला ठळकपणे दाखवायचे नाही. दरम्यान, द्रमुकच्या उपसरचिटणीस कनिमोळी यांनी सांगितले की, 'इस्रो'चे नवीन प्रक्षेपण केंद्र योजना द्रमुकने गेल्या दहा वर्षांत विकासासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे.

# वंचितची ४८ पैकी २७ जागांची मागणी

## मविआ किती जागा सोडणार? जितेंद्र आव्हाड म्हणाले

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीकरता जागावाटप करण्यासाठी महाविकास आघाडीतल्या नेत्यांची बैठकांची सत्रं आणि चर्चा चालू आहेत. या आठवड्यात मविआ नेत्यांच्या दोन महत्त्वाच्या बैठका झाल्या आहेत. मविआ नेत्यांची आजही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मविआमधील प्रमुख नेत्यांच्या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे प्रतिनिधीदेखील हजर होते. यावेळी वंचित बहुजन आघाडीने मविआकडे लोकसभेच्या महाराष्ट्रातील ४८ पैकी २७ जागांची मागणी केली आहे. यावर आता मविआ नेत्यांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. मविआची बैठक संपल्यानंतर राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी



प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी आव्हाड म्हणाले, कुठल्याही परिस्थितीत भाजपाला पराभूत करणं आणि देशाचं संविधान वाचवणं हे एकच उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करत आहोत.

आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले, कोणी किती जागा मागितल्या, किती दिल्या, किती घेणार वगैरे या गोष्टींवर फारसा भर दिला जात नाही. आमची सर्वांची एकच मासनिकता आहे की, कुठल्याही परिस्थितीत भाजपाला पराभूत करायचं आहे आणि देशाचं संविधान वाचवायचं आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख बाळासाहेब आंबेडकर (प्रकाश आंबेडकर) यांची भूमिका आमच्यासारखीच आहे.

वंचित बहुजन आघाडीने मविआकडे तब्बल २७ जागा मागितल्या आहेत, आचारसंहिता लागायला अवघे १० ते १२ दिवस शिल्लक असताना इतकी अवाजवी मागणी करून प्रकाश आंबेडकर दबावतंत्राचा वापर करत आहेत का? असा प्रश्न प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी जितेंद्र आव्हाड यांना विचारला. त्यावर आव्हाड म्हणाले, अजिबात नाही! प्रकाश आंबेडकर त्या मताचे बिलकूल नाहीत. भाजपाला हरवणं आणि संविधान वाचवणं हीच आमची आणि त्यांचीही भूमिका आहे. बाळासाहेब आंबेडकर या भूमिकेपासून लांब जाणार नाहीत. शेवटी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार आहेत.

# सुनेत्रा पवारांच्या उमेदवारीबाबत सुप्रिया सुळे पहिल्यांदाच बोलल्या

**बारामती :** सुप्रिया सुळे यांनी यावेळी मुंबईतल्या पिण्याच्या पाणीटंचाईवरही भाष्य केलं.

महायुतीत बारामती लोकसभेची जागा अजित पवार गटाला मिळणार आहे. परंतु, अजित पवार गट या मतदारसंघात कोणत्या उमेदवाराला संधी देणार हे अद्याप जाहीर झालेलं नाही. गेल्या काही दिवसांमधील अजित पवार गटातील नेत्यांची वक्तव्ये, कार्यकर्त्यांचे होर्डिंग्स पाहता अजित पवार त्यांच्या पत्नीला म्हणजेच सुनेत्रा पवार यांना या मतदारसंघातून लोकसभेच्या रिंगणात उतरवू शकतात. त्यामुळे बारामतीच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि त्यांची भावजय सुनेत्रा पवार यांच्यात सामना रंगू शकतो. दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीबाबत सुप्रिया



सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनी काही वेळापूर्वी बारामती येथे कार्यकर्ते आणि प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी वेगवेगळ्या गोष्टींवर भाष्य केलं. सरकारच्या बारामतीत होणाऱ्या रोजगार मेळाव्याविषयी सुप्रिया सुळे म्हणाल्या, आतापर्यंत मला कोणत्याही कार्यक्रमाचं निमंत्रण आलेलं नाही. मला या सर्व कार्यक्रमाची माहिती पत्रकारांकडून मिळाली आहे. तसेच मतदारसंघात होणाऱ्या शासकीय कार्यक्रमांविषयी सुप्रिया सुळे म्हणाल्या, केंद्र आणि महाराष्ट्र सरकारचे जे कार्यक्रम असतात या कार्यक्रमांविषयी २०१५ च्या शासकीय अधिसूचनेनुसार स्थानिक खासदारांचं नाव घ्यावं लागतं.

# बसवराज पाटील यांच्या भाजप प्रवेशाचा काँग्रेसला फटका किती ?



**छत्रपती संभाजीनगर :** धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील औसा मतदारसंघातील लिंगायत मतांवर प्रभाव असणाऱ्या बसवराज पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या भाजप प्रवेशाचा काँग्रेसवर कितपत प्रभाव पडणार याची आता चर्चा सुरू झाली आहे.

बसवराज पाटील हे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील यांचे कट्टर समर्थक. 'देवघर' हे लातूर शहरातील माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निवासस्थानाचे नाव आहे. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशाला शिवराज पाटील यांचे आशीर्वाद आहेत का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. एकेकाळी काँग्रेसच्या 'किचन कॅबिनेट'मध्ये शिवराज पाटील यांचे नाव होते. त्यामुळे बसवराज पाटील यांचे भाजपमधील येणे अधिक महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

धाराशिव लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार कोण, या चर्चेत आता बसवराज पाटील यांच्या नावाची भर पडली आहे. या लोकसभा मतदारसंघात उमरगा, औसा आणि बार्शी या विधानसभा मतदारसंघातील लिंगायत मतांचा प्रभाव अधिक आहे. त्यामुळेच अलिकडे भाजपने लिंगायत मतांच्या बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. अजित गोपछेडे यांना राज्यसभेत बिनविरोध निवडून देण्यामागेही ही बेरीज असल्याचा दावा केला जात होता.

मात्र, निवडणूक लढवून विजयी होणाऱ्या उमेदवाराचा भाजपचा शोध सुरूच होता. औसा विधानसभेत २००९ व २०१४ च्यामध्ये निवडून आलेल्या बसवराज पाटील यांना भाजपने हेरले. २०१९ मध्ये औसा मतदारसंघातून भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांनी बसवराज पाटील यांचा पराभव केला होता. त्यामुळे बसवराज पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे अभिमन्यू पवार हे अधिक खूश झाल्याचे सांगण्यात येते. नांदेड, लातूर, धाराशिव या तीन लोकसभा मतदारसंघात लिंगायत मतांचा प्रभाव असल्याचे दिसून आले आहे. मराठवाडा शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये सूर्यकांत विश्वासराव यांना लक्षणीय मते मिळाली होती. त्यानंतर भाजपची रणनिती ठरवली जात होती.

# शिरोळमध्ये आज घागर मोर्चा


**शिरोळ :** यावर्षी पाऊस कमी पडल्याने कोयना धरण १००% भरले नव्हते त्यामुळे यावर्षी उन्हाळ्यात पाणी टंचाईला समोरे जावे लागणार आहे.

शिरोळ गावाला आधीच दोन दिवसानंतर पाणी मिळते त्यात पाणी टंचाईच्या सुरुवातीच्या टप्यातच आता ६ दिवसानंतर पाणी दिले जात आहे. ज्या प्रकारे दुष्काळी भागात पाण्याची परिस्थिती असते तशी परिस्थिती शिरोळ ची या कारभाऱ्यांच्या चुकीमुळे निर्माण झाली आहे.

दोन नद्या असलेल्या गावाला ६ दिवसांनी पाणी मिळते हे कोणाला सांगून पण पटणार नाही. पण नगरपरिषद चा अनागोंदी कारभार आणि कारभाऱ्यांचे जनतेशी देणंघेणं नसणं यामुळे शिरोळ वासियांना त्रास होत आहे. पाचवा निषेध करण्यासाठी गुरुवारी नगरपरिषदेवर मोर्चाचे आयोजन केले आहे अशी माहिती आंदोलन अंकुश प्रमुख धनाजी चुडमुंगे यांनी दिली. नगरपरिषद एक महिना कर उशिरा भरला म्हणून २% दंड व्याज लावते कारण तशी कायद्यात तरतूद आहे म्हणून तसं नागरिकांना दररोज पाणी देणं ही सुद्धा नगरपरिषद ची कायदेशीर जबाबदारी आहे ती मात्र पार पाडली जात नाही.जनतेने कायदा पाळायचा पण अधिकाऱ्यानी तो पाळला नाही तरी चालेल असं कुठे लिहिले नाही. आपण त्यांना कायदा पाळायला भाग पाडत नाही ही आपली चूक आहे म्हणून ते कायदा मोडतात. सध्या लोकशाही व्यवस्था इतकी संकुचित झाली आहे की त्यामध्ये नागरिकांचे मूलभूत हक्क डाववले जात आहेत व नागरिक म्हणून घटनेने मिळालेल्या अधिकारावर गदा आणली जात आहे.

# रामटेकडी औद्योगिक वसाहतीतील मधील पुना बायो प्रकल्पातील कचरा हटणार कधी?

**हडपसर :** हडपसर भागात असलेल्या रामटेकडी इंडस्ट्रीयल मधील पुना बायो एनर्जी सिस्टीम कचरा प्रकल्पात हजारो टन कचरा ढंपिंग करुन ठेवण्यात आल्याने तसेच पुना बायो प्रकल्पाचा पाचसहा हजार टन कचरा उघड्यावर ढंपिंग करुन ठेवण्यात आल्याने येथील प्रकल्पामधील साचून राहिलेल्या कच-यांमुळे सय्यदनगर, रामटेकडी,ससाणेनगर, वैदवाडी हडपसर भागातील नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे नागरिक सांगत आहेत. कच-याचा मोठा डोंगर जवळपास लाखो टन कचरा साचल्याने परिसरात वायु प्रदुषण तसेच हवेत दुर्गंधी पसरत असून परिसरातील नागरीकांना सुद्ध हवा मिळणे मुश्कील झाले आहे. कांही नागरीकांना श्वसनाचे आजार होत असल्याचे सांगण्यात येते,पुणे महापालिकेने कोरोना



**रामटेकडी औद्योगिक वसाहतीतील मधील पुना बायो प्रकल्पात प्रक्रिया न करता साचून राहिलेला हजारो टन कचरा.**

काळात शहरातील अनेक प्रकल्प बंद केल्यावर रामटेकडी येथील पूना बायो प्रकल्पामधील जागेत उघड्यावर ढंपिंग करुन ठेवण्यात आलेला आहे.तो कचरा जवळपास एक लाख चाळीस हजार मेट्रिक टन आहे.तो कचरा येथील ठिकाणी ढंपिंग करण्यात आला.

याला तीनचार वर्ष लोटत आले तरी येथील कचरा कांही हटत नाही, उलट पुना बायोचा पण पाचसहा हजार टन त्यात मिसळण्यात आला आहे.

पुना बायो एनर्जी सिस्टीम कचरा प्रकल्पास महापालिका पर मेट्रिक टनास ४१९ रुपये देऊन ही येथील प्रकल्पात हजारो टन कचरा साचून राहिल्याने नागरीकांच्या आरोग्यास खिलवाड करणा-या मनपा व संबंधित प्रकल्पा विरोधात नागरिकांनी व संघटनांनी कचरा प्रकल्प बंद करण्याचा इशारा दिला आहे.

संबंधित घनकचरा विभागाशी संपर्क करून देखील पुरेशी माहिती मिळत नाही. येथील पुना बायो कचरा प्रकल्पातील उघड्यावर साचलेला सुका , ओला कचरा लवकर हटविण्यात यावा ,अशी मागणी नागरीकांनी केली. पुना बयो प्रकल्पात बाहेर उघड्यावर ढंपिंग केलेला कचरा हटविण्यासाठी टेंडर काढण्यात आलेले होते चार कंपनीना टेंडर मिळालेले होते.कचरा हटविण्यासाठी २०१९ ते २०२३ पर्यंत पर मेट्रिक ९८० रु दिले असल्याचे सांगण्यात येते, चार मधील दोन कंपनीने काम केले दोन कंपनीने व्यवस्थित काम केले नाही, एक लाख एकोणचाळीस हजार टना मधील थोडाफार कचरा उचलला गेला टेंडर काढून व कचरा उचलण्याचे बील पास करून कचरा तसाच सोडून निघून गेले, यात आमच्या प्रकल्पाचा पाचसहा हजार टन कचरा डिसेंबर/ नोव्हेंबर २०२३ मधील असल्याचे पुना बायो प्रकल्पाचे मॅनेजर यांनी माहिती दिली.

# नृसिंहवाडी ग्रामपंचायतीत दत्तगुरु आघाडीची सत्ता

## रमेश मोरे पुन्हा उपसरपंचपदी; ३ सदस्य फुटल्याने दत्तराज आघाडीला मोठा धक्का

**कुरुंदवाड :** नृसिंहवाडीच्या राजकीय पटलावर मोठा भूकंप झाला असून जगदाळे-धनवडे युतीच्या दत्तगुरु ग्रामविकास आघाडीची सत्ता प्रस्थापित झाली आहे. सत्ताधारी दत्तराज आघाडीतून २ सदस्यांसह बाहेर पडत रमेश मोरे यांची पुन्हा एकदा उपसरपंच पदी वर्णी लागली आहे. आज ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या उपसरपंच निवडीत ६ विरुद्ध ३ अशा बहुमताने मोरे यांची उपसरपंच पदी निवड झाली. दत्तराज आघाडीतून ग्रा. प सदस्य रमेश मोरे विद्या कांबळे, अनघा पुट्टो पुजारी बाहेर पडल्याने नृसिंहवाडीच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले आहे.

उपसरपंच पदाची निवड निवडणूक अधिकारी अमित पडळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ग्रामपंचायत सदस्य धनाजीराव जगदाळे, चेतन गवळी, चित्रा सुतार हे दत्तगुरु आघाडीच्या सदस्य व बाहेर पडलेले ३ सदस्य अशा बहुमताच्या समीकरणामुळे दत्तराज आघाडीचे वर्चस्व संपुष्टात आले आहे. दरम्यान, मोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर दत्तराज आघाडीकडून मंगल खोत यांनी अर्ज दाखल केला होता. प्रत्यक्ष मतदानावेळी त्यांच्या बाजूने केवळ ३ मते पडली तर सदस्या पूनम जाधव या अनुपस्थित होत्या. निवडीनंतर बोलताना नूतन उपसरपंच रमेश मोरे यांनी गेल्या तीन वर्षात कुरघोडीच्या राजकारणाला वैतागून विकासात्मक कामांसाठी दत्तगुरु आघाडीला पाठिंबा दिल्या असल्याचे सांगितले. तसेच प्रभाग क्रमांक दोन मधील सर्व सदस्यांसह आपण बाहेर पडत असल्याचे जाहीर केले. माजी यशवंत सरपंच धनाजीराव जगदाळे म्हणाले, केवळ विरोध म्हणुन आम्ही कधी राजकारण केले नाही. विकासाच्या मुद्द्यावरच आम्ही आमचा विरोध दर्शवला आहे. मोरे यांच्यासह तीन सदस्यांनी धैर्य दाखवत पाठिंबा दिल्याने आता आम्ही लोकांच्या मूलभूत प्रश्नांवर काम करणार आहोत.

यावेळी माजी उपसरपंच अनंत धनवडे म्हणाले, हेव्यादाव्यांच्या राजकारणामुळे ग्रामपंचायतीला घरघर लागली होती. त्यामुळे अशा गलिच्छ राजकारणाविरुद्ध हा एक प्रकारे गावानेच उठाव केला आहे, असे सांगत त्यांनी सत्ताधारी दत्तराज आघाडीवर घणाघाती आरोप केले. विनोद पुजारी यांनी सर्वांनी मतभेद विसरून एकत्र येण्याचे आवाहन केले. यावेळी सागर धनवडे, शशिकांत बड्डु पुजारी, रमेश सुतार, बजरंग कांबळे, उत्तम पुजारी, प्रतीक धनवडे, अजय कंदले, संदीप खोचरे, किरण माने, मधुकर गवंडी, राकेश सुतार, विनायक काळे, जनार्दन कुमठेकर, सागर मोरबाळे, राकेश खिरुगडे, गणेश सुतार, प्रीतम साळुंखे, सनी माने, सुनील धनवडे, अमित गवळी, शिरीष सुतार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. गतवर्षीच्या ग्रामपंचायत कार्यकाळात दत्तराज आघाडीने जगदाळे गटाचे तीन सदस्य फोडून सत्ता हस्तगत केली होती. त्याचीच यंदा पुनरावृत्ती करत धनाजीराव जगदाळे यांनी सत्ता हिसकवल्याचा वचपा काढला आहे.

# करेक्ट कार्यक्रम!



मागणी कोणतीही असो; तिच्या पूर्ततेसाठी आंदोलन सुरू करण्यास धारिष्ट्य लागते हे खरेच. परंतु ते थांबवण्यासाठी धारिष्ट्याच्या जोडीला शहाणपणही लागते. त्याच्या पुरेशा मात्रेअभावी काय होते हे मनोज जरांगे यांचे जे झाले त्यावरून लक्षात घेता येईल. खरे तर जरांगे निष्णात उपोषणकार! साधारण दीडेक डझन उपोषणांचा अनुभव त्यांच्या गाठीशी असावा. तेव्हा स्वत:च्या आधीच्या उपोषणांची सांगता कशी झाली, ती उपोषणे यशस्वी ठरली म्हणजे काय, त्यांच्या यशाचे काय झाले आदी प्रश्नांचा विचार जरांगे वा त्यांच्या सल्लागारांनी केला असता तर आता जे काही झाले ते झाले नसते.

स्वानुभवातून जाणून घेणे त्यांस मंजूर नसणे शक्य आहे. स्वत:चे कटु अनुभव कोण पुन्हा आठवणार. ही त्यांची भावना समजून घेता येण्यासारखीच. त्यांनी अण्णा हजारे यांच्या आंदोलनांचे स्मरण केले असते तरी चालले असते. तसे न केल्यामुळे गावातल्याच महिलांच्या हस्ते जलपानाने त्यांना आपल्या 'उपोषणाची' सांगता करावी लागली. गेल्या खेपेप्रमाणे यावेळी मुख्यमंत्री सोडाच; पण गिरीश महाजन वा तत्सम कोणीही त्यांनी उपोषण मागे घ्यावे म्हणून गळ घालावयास आले नाही. जे झाले त्यात काहीही आश्चर्य नाही. त्याची प्रमुख कारणे दोन. कोणतेही आंदोलन ते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे 'चालवणाऱ्या'स वाटते तितकेच आणि तोपर्यंतच यशस्वी होऊ शकते. ते कथित यश दृश्यमान झाले की आंदोलक आणि आंदोलन यांची उपयुक्तता पूर्ण संपते. जरांगे यांस हे लक्षात आले नाही. आणि दुसरे म्हणजे कोणतेही आंदोलन किती पुढे न्यायचे आणि कोणत्या टप्प्यावर मागे घ्यायचे याची पूर्ण कल्पना ते सुरू होण्याआधीच असावी लागते. जरांगे यांस ती नव्हती. त्यामुळे आपली मागणी मान्य झाल्याचे कथित 'यश' (?) पदरात पडल्यावरही ते आंदोलन करत राहिले. शेवटी मग ही वेळ आली. त्यात त्यांची आणखी एक चूक झाली.

ती म्हणजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी त्यांनी केलेला अत्यंत असभ्य भाषेचा प्रयोग आणि त्यातील जातीयतेची भावना. यातून जरांगे यांचे वैफल्य आणि अपरिपक्वताच तेवढी समोर आली. आपण सुरू केलेल्या आंदोलनाचे फलित आपल्या पदरात पडणार नाही, श्रेय आपल्याऐवजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळणार इत्यादी कारणांमुळे त्यांस राग येणे शक्य आहे. पण त्या रागाचे प्रदर्शन त्यांनी ज्या शब्दांत केले त्यातून जरांगे यांच्या मर्यादा तेवढ्या समोर आल्या. इतक्या ढळढळीतपणे ज्याच्या मर्यादा दिसून येतात त्यास हाताळणे अत्यंत सोपे असते. ते किती सोपे होते/आहे हे मुख्यमंत्री शिंदे यांनी अनेकदा दाखवून दिले. दुसरे म्हणजे त्यांनी फडणवीस यांची जात काढली. ते ब्राह्मणी कावा करतात असे जरांगे यांचे म्हणणे. फडणवीस ब्राह्मण आहेत आणि जरांगे मराठा. त्यामुळे फडणवीस यांची कृती जशी ब्राह्मणी ठरवता येते त्याचप्रमाणे जरांगे यांच्या कृती/भाषेविषयीही म्हणता येईल. तसे कोणी म्हणाले नाही. हा 'त्यांचा' मोठेपणा. तो दाखवण्यात जरांगे कमी पडले. जरांगे हे काही समस्त मानवजातीच्या उद्धारासाठी लढत नव्हते. त्यांचे आंदोलन फक्त मराठ्यांपुरतेच मर्यादित होते. याचा अर्थ त्यांचा दृष्टिकोनही स्वत:च्या जातीपुरताच मर्यादित होता आणि त्यात काहीही वैश्विक नव्हते. आणि नाहीही. अशा वेळी इतरांची जात काढण्याचा त्यांना काहीही अधिकार नाही. नसलेल्या अधिकाराचा वापर ते करायला गेले आणि त्यातून स्वत:वरच माघार घेण्याची वेळ त्यांनी आणली. हे झाले त्यांच्या आंदोलनाविषयी. आता त्यांच्या मागणीबाबत.

मराठा समाजास विद्यामान आरक्षण मर्यादेच्या पलीकडे आपण १० टक्के आरक्षण दिल्याचे आणि त्यासाठी आवश्यक पाहणी पूर्ण केल्याचे सरकार सांगते. हा दावा सरकारपुरता ठीक. तो जोपर्यंत न्यायालयाच्या छाननीतून सहीसलामत सुटत नाही तोपर्यंत सरकारला स्वत:ची झाकलेली मूठ सव्वा लाखाची आहे असे म्हणत राहावेच लागणार. तेव्हा या मुद्द्यावर खरे तर जे झाले ते आपल्यामुळे असे म्हणत जरांगे यांस स्वत:कडे श्रेय घेत राज्यभर श्रीफळ/शाली घेत सत्कार स्वीकारत मिरवता आले असते. पण न थांबता 'ओबीसीं'च्या वाट्यातून मराठा समाजास आरक्षण हवे असा हट्ट धरला. तो हास्यास्पद होता.

कोणत्याही आंदोलनाचा भर आंदोलकर्त्यांस काय हवे यावर असतो. तसाच असायला हवा. पण जरांगे मराठ्यांच्या आरक्षणापलीकडे जाऊन 'ओबीसीं'च्या आरक्षणात वाटेकरी होऊ पाहात होते. सरकार ते कसे ऐकणार? तेव्हा सरकारने देऊ केलेल्या दहा टक्के आरक्षणात काहीही तथ्य नाही असे जरांगे यांस वाटत असले आणि ते खरेही असले तरी यापेक्षा अधिक काही त्यांना मिळणार नाही. ते तसे मिळवायचे असेल तर महाराष्ट्रात डोकेफोड करण्यात काय हशील? या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने तरी मर्यादा उल्लंघनाचा निकाल द्यावा लागेल अथवा केंद्र सरकारलाच मराठा आरक्षणाची गरज वाटून त्यानुसार निर्णय घ्यावा लागेल. याचा साधा अर्थ असा की राज्य सरकारने कितीही औदार्य दाखवून दहाच काय पण वीस टक्के आरक्षण जरी दिले तरी दिल्लीत सर्वोच्च न्यायालय वा केंद्र सरकार त्याबाबत काही निर्णय घेत नाहीत तोपर्यंत ते अमलात येणे अवघड. परत असे काही फक्त मराठ्यांबाबत करता येणार नाही. अन्य राज्यांतील अन्य जातींचाही विचार जरांगे यांस नाही तरी केंद्रास करावा लागेल. 'लोकसत्ता'ने विविध संपादकीयांद्वारे हे वास्तव अनेकदा मांडले. जरांगे यांस त्याची आता जाणीव झाली आणि ते संतापले.

तसे होणे साहजिक. म्हणून आंदोलन करू इच्छिणाऱ्यास अंत:प्रेरणेवर विसंबून चालत नाही. आंदोलनाचा प्रसार-प्रचार हा भावनेवर आधारित असतो हे खरे. पण त्याच्या यशापयशात भावनेस शून्य स्थान असते. तेथे लागते ते बुद्धीचे कौशल्य. म्हणून कोणत्याही आंदोलनात बुद्धिमानांचा सहभाग असावा लागतो आणि आंदोलनाची चोख बौद्धिक बैठक सिद्ध करावी लागते. नुसते 'मला हे हवेच हवे' असे म्हणून चालत नाही. तसे होत राहिले आणि बुद्धिवानांचा, दुसऱ्या फळीचा तसेच उत्तम चर्चकांचा पाठिंबा नसेल तर व्यवस्था आंदोलकांस दमवते आणि अखेर स्वत:ला हवे तितकेच करते. मराठा आंदोलनाबाबत असे झाले किंवा काय याचा विचार जरांगे यांस आता तरी करावा लागेल. हे माध्यमांच्या कॅमेरा झोतात करता येत नाही. आपण आडवे पडलो आहोत, अनेक ज्येष्ठ आपल्या नाकदुऱ्या काढत आहेत, बाबा-पुता करत आहेत आणि सर्वत्र त्याचे थेट प्रक्षेपण होत आहे ही अवस्था या दृश्यातील केंद्रीय व्यक्तीसाठी विलोभनीय खरीच. पण या दृश्यावर विश्वास ठेवला तर डोक्यात हवा जाण्यास वेळ लागत नाही. व्यवस्था नाकदुऱ्या काढत असते ती काही उपोषणकर्त्यांच्या जिवाची काळजी आहे म्हणून नाही तर त्याच्या जिवाचे काही बरेवाईट झाले तर आपण परिस्थिती हाताळण्यात कमी पडलो अशी भीती संबंधितांस असते म्हणून! भीती ही झुगारून दिली जात नाही तोपर्यंतच परिणामकारक असते. नंतर काय होते ते मुख्यमंत्र्यांच्या 'करेक्ट कार्यक्रम' उद्गारातून लक्षात यावे. सबब आंदोलनकर्त्यांस स्वत:चा कार्यक्रम, त्याच्या मर्यादा ठाऊक असाव्या लागतात, नपेक्षा सरकारकडून आंदोलनाचा 'करेक्ट कार्यक्रम' केला जातो. मराठा आरक्षणाबाबत तसे झाले असेल तर त्याचा दोष आंदोलनकर्त्यांस घ्यावा लागेल.

# रेल्वे पायाभूत सुविधांमुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल : शंकर जगताप

## रेल्वे स्थानकाच्या रु. २०.४४ कोटींच्या पुर्नविकासाच्या कामांचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते उदघाटन

**पिंपरी :** अमृत भारत स्टेशन योजना ही रेल्वे क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेतून रेल्वे स्टेशन आधुनिक सुविधांनी युक्त होतील आणि प्रवाशांना चांगल्या प्रवासाचा अनुभव मिळेल. या योजनेमुळे देशाच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे प्रतिपादन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.

अमृत भारत स्टेशन योजनेच्या अंतर्गत पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदीच्या हस्ते देशभरातील ५५४ रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास, १५०० रोड ओव्हर ब्रिज आणि अंडरपासचे भूमिपूजन तसेच उद्घाटन करण्यात आले. या योजनेच्या अंतर्गत पुणे मंडलाच्या चिंचवड रेल्वे स्थानकाचाही समावेश आहे. एकू २०.४४ कोटींच्या पुर्नविकासाच्या कामाचा पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उदघाटन झाले. त्यावेळी शहरवासियांना शुभेच्छा देतांना चिंचवड रेल्वे स्थानक परिसरात आयोजित कार्यक्रमात शंकर जगताप बोलत होते.



यावेळी खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, पुणे मंडलाच्या प्रबंधक इंदू दुबे, प्रदेश निमंत्रित सदस्य महेश कुलकर्णी, प्रवक्ते राजू दुर्गे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, अजय पाताडे, युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे, नगरसेवक राजेंद्र गावडे, नगरसेविका मीनाताई कुलकर्णी, आरतीताई चोंधे, सविता खुळे, बेटी बचाव बेटी पढाओ संयोजिका प्रीती कामतिकर, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, निलेश अष्टेकर, संतोष तापकीर, योगेश चिंचवडे, दीपक भोंडवे, सिद्धेश्वर बारणे, शेखर चिंचवडे, देवदत्त लांडे, सांस्कृतिक आघाडी संयोजक विजय भिसे, मधुकर बच्चे, राजश्री जायभाय, प्रकाश जवळकर, निता कुशारे, सचिन काळभोर, बाळासाहेब भूंबे, रवींद्र नांदुरकर, पल्लवी मारकड, पल्लवी पाठक, पल्लवी कोल्हापुरे, सज्जाद तांबोळी, मनिषा शिंदे आदी पदाधिकारी तसेच रेल्वे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विकसित भारत आणि विकसित रेल्वे या विषयावर आयोजित चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. सदर देशभरात २ हजारहून अधिक ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे होते. यास ४० लाखाहून अधिक नागरिकांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शविली.

शंकर जगताप म्हणाले की, अमृत भारत स्टेशन योजनेच्या अंतर्गत मुंबई पुणे रेल्वेमार्गावर असलेल्या चिंचवड रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी रु. २०.४४ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. शहराच्या बाजूने प्रवेशद्वार येथे नवीन प्रवेश लॉबीसह मुख्य प्रवेशद्वार गेट, नवीन पोर्टिको देऊन मोहोर सुधारणा करण्यात येणार आहे. ज्यामध्ये सुधारित शौचालये, पाणी बूथ, एटीएम यांसारख्या अनेक सुविधा असणार आहेत. पार्किंग सुविधांसह फिरणाऱ्या क्षेत्राचा विकास आणि लँडस्केपिंगसह पार्किंगपासून प्रवेशद्वारापर्यंत झाकलेला पादचारी मार्ग विकसीत करण्यात येणार आहे. ०४ लिफ्ट आणि ०२ एस्केलेटरची तरतूद करण्यात आली आहे. प्लॅटफॉर्मवर पूर्ण झाक (सुमारे २००० चौरस मीटर) प्लॅटफॉर्मची सुधारणा, प्लॅटफॉर्ममध्ये बसण्याची क्षमता वाढविण्यासाठी अतिरिक्त मॉड्यूलर फर्निचर तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक प्लॅटफॉर्मवर नवीन सुधारित शौचालये आणि पाण्याची व्यवस्था, दिव्यांगजन अनुकूल शौचालये, तसेच लिफ्ट, रॅम्प आणि वेगळी पार्किंग यासारख्या इतर सुविधा, संपूर्ण स्थानिक परिसराची रोषणाई सुधारणा, सर्व खोल्या आणि फिरणाऱ्या क्षेत्राचा समावेश, कोच निर्देश फलक, व्हिडिओ डिस्प्ले युनिटसह रेल्वे माहिती प्रणाली आणि सुधारित सांकेतिका, दोन्ही प्रवेशद्वार, पाणी बूथ, शौचालये येथे असलेल्या विद्यमान बुकिंग कार्यालयाचे नूतनीकरण, कंपाऊंड वॉल यासह स्थानिक कला आणि संस्कृती समाविष्ट करणे, पर्यटकांसाठी स्थानिक आकर्षणांची माहिती, इतिहास इत्यादी. शिल्प, पेंटिंग्ज, भिंतीचित्रे, माहितीपूर्ण प्रदर्शने इत्यादींचा समावेश आहे.



# स्वयंचलित संगणक प्रणालीचे महानगरपालिका कर्मचा-यांना प्रशिक्षण

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी आणि प्रशासन अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी अनेक नवीन तंत्रज्ञान राबविण्यात येत आहे. स्मार्ट सिटीच्या जीआयएस प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या विविध विभागांसाठी ३५ आयटी सॉफ्टवेअर्स एकात्मिक पद्धतीने विकसित करण्यात येत आहे. याअनुषंगाने, दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी स्थायी समिती सभागृह, मुख्य कार्यालय येथे ८० हून अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांना या प्रणालींचा वापर कसा करावा, तसेच प्रस्ताव तयार करणे, प्रस्तावाची नोंद ठेवणे, खरेदी/टेंडर प्रक्रिया, वर्क ऑर्डर तयार करणे, इतर स्वयंचलित प्रक्रिया आदींबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उपायुक्त संदीप खोत, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, कार्यकारी अभियंता हरदिपसिंग बन्सल आदी उपस्थित होते. प्रकल्प सल्लागार राजा डॉन, सुदीप मिटकरी, एटोसचे अविनाश पाटील, अमित उपाध्याय, धिरज पाटील, साजन सानप, निलेश शिरलकर यांनी सोप्या भाषेत संगणक प्रणालीची माहिती दिली. तसेच, कर्मचा-यांना उदभवणा-या अडचणींवर चर्चा करण्यात आली.

प्रशासनाला शहराची चांगल्या प्रकारे योजना बनवण्यास आणि समस्या सोडवण्यास तसेच कार्यक्षमता वाढणे, कामाचा वेळ कमी होणे, त्रुटी कमी होणे यासाठी जीआयएस (भौगोलिक माहिती प्रणाली) आणि ईआरपी (एंटरप्राइझ रिसोर्स प्लॅनिंग) सारख्या प्रणालींचा समावेश करण्यात आला आहे. या प्रणालीच्या वापरामुळे नागरिकांना जलद आणि कार्यक्षम सेवा, सुधारित पायाभूत सुविधा, अधिक पारदर्शक प्रशासन यासारखे अनेक फायदे मिळणार आहे. जीआयएस प्रणालीद्वारे शहरातील सर्व भौगोलिक माहिती (रस्ते, इमारती, नकाशे इत्यादी) एका ठिकाणी संग्रहित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्याचबरोबर, ईआरपी प्रणालीद्वारे महानगरपालिकेच्या सर्व विभागांना एकात्रित करण्यात येत असून, त्यांचे काम अधिक कार्यक्षम बनविण्यात येत आहे.

# समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी शिक्षण संस्थांसाठी नियमावली




**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० हे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांना चालना देण्यासाठी, शैक्षणिक संस्थांमधील सहयोग सुलभ करण्यासाठी नाविन्यपुर्ण प्रशासन संरचनेची क्षमता व फायदे ओळखून विद्यमान संलग्नता प्रणाली टप्प्या-टप्प्याने कमी करून नाविन्यपुर्ण बहुविद्याशाखीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक लवचिकता प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेबर, २०२२ मध्ये उच्च शिक्षण संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतरित करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली आहेत या मार्गदर्शक तत्वाचे अनुपालन करण्याचा एक मार्ग हा महाविद्यालयांचे समूह तयार करणे आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (ठणड-) या अंतर्गतही विद्यमान उच्च-कार्यक्षम शैक्षणिक संस्थांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यानुसार याअंतर्गत राज्यात (डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई, हैद्राबाद सिंध नॅशनल कॉलिजिएट विद्यापीठ, मुंबई आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा). ही तीन समूह विद्यापीठे कार्यरत आहेत. म्हणून राज्यातील समुह विद्यापीठांना चालणा देण्यासाठी काय मार्गदर्शक तत्त्वे असावी यासाठी शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- २०२३ / प्र.क.११२ / विशि- ३, नुसार राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मंडळातर्फे दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहेत.

### समुह विद्यापीठांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

**समूह विद्यापीठ तयार करण्यासाठी, एकाच व्यवस्थापन व शैक्षणिक संस्थेच्या अधिपत्याखालील एकाच जिल्ह्यातील किमान २ व कमाल ५ अनुदानितअनुदानित तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संसाधने, शैक्षणिक, भौतिक आणि तांत्रिक सुविधांचे एकत्रीकरण करणे आवश्यक राहील, यापैकी किमान एक महाविद्यालय अनुदानित महाविद्यालय असणे आवश्यक राहील.**

**कृषी व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम वगळता उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येत असलेली सर्व पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होण्यास पात्र असतील.**

**व्यवस्थापन व शैक्षणिक संस्थेची क्षमता असेल तर ५ पेक्षा जास्त महाविद्यालये किंवा संस्था समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट करण्यासाठी राज्य शासन प्रकरणनिहाय मुल्यांकन करू शकेल.**

**समूह विद्यापीठातील प्रमुख महाविद्यालय मागील २० वर्षांपासून अस्तित्वात असले पाहिजे**

**प्रमूख महाविद्यालयात किमान २००० विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक राहील.**

**सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये किमान ४००० विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक राहील**





# देशात पुन्हा मोदी सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ : उपमुख्यमंत्री अजित पवार

**भोर :** देशात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यासाठी घड्याळ चिन्ह लक्षात ठेवा व बारामती मतदार संघात लोकसभा निवडणुकीत महायुतीचा जो उमेदवार दिला जाईल त्याला प्रचंड मताने निवडूण दया असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवार (दि.२४) रोजी शिवशंभो लॉन माळेगाव (नसरापूर) येथे आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात कार्यकर्त्यांनसह जनतेला केले.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर बहुमता च्या जोरावर अजित पवार यांनी पक्ष व चिन्ह मिळवि ल्यानंतर भोर विधानसभा मदारसंघात त्यांनी प्रथमच शेतकरी मेळाव्याच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बारामती लोकसभा मतदार संघात सुप्रिया सुळे यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस चा उमेदवार निवडून आणण्यासाठी अजित पवार यांनी मोर्चे बांधणी सुरु केली असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सध्या देशात मोदी लाटेचा प्रभाव असून तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार असे झालेल्या सर्व्हे नुसार ६५ टक्के लोकांचे मत आहे. त्यामुळे देशात पुन्हा एकदा मोदी सरकार येणार आहे ही काळ्या दगडावरची रेघ आहे असा घाढ विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

भोर वेल्हा आयोजित शेतकरी मेळाव्यात अजित पवार अनेक विषयावर बोलले पुढे ते म्हणाले की मी कामांसाठी हपापलेला असून बारामती लोकसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. मी जिल्हा बँकेचा ३२ वर्ष अध्यक्ष होतो. मी कामाचा माणूस आहे.

### रुपाली चाकणकर यांची सुप्रिया सुळे यांच्यावर जहरी टीका

**यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांशी संवाद साधताना रुपाली चाकणकर म्हणाल्या की नाकाने कांदे सोलणाऱ्यानो तुमचे आमच्या दादांशिवाय पान हालत नाही. तसेच बारामती लोकसभा संघातील खासदार दादांमुळेच निवडूण येत होत्या. जहरी अशी टीका सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता केली.**

मी नेहमीच कडक बोलत असून माझे नाण खणखणीत वाजत. माझ्या पालक मंत्री पदाचा फायदा १३ तालुक्यांना व्हावा याचा मी पुरेपूर प्रयत्न करत आहे.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की राज्यातील विविध प्रकल्प गुजरातला जात असल्याचे आरोप विरोधकांकडून केले जात आहेत आता महानंद डेअरी देखिल गुजरातला गेल्याचे बोलले जात आहे त्यावर उत्तर करत अजित पवार म्हणाले की महानंद डेअरी कुठे गेली नसून ती गोरेगावलाच आहे तेथे जाऊन पहावे तिथेच दिसेल. विरोधकांना आता बोलायला काहीच राहीले नाही त्यामुळे ते काहीही बोलत आहेत अशी टीका त्यांनी यावेळी केली.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की बारामती लोकसभा मतदार संघात मी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. अनेकांनी या मतदासंघाचे प्रतिनिधित्व केले आहे त्यांची कारकीर्द तूम्ही पाहिलीच आहे. आता योग्य उमेदवार देण्याचं काम महायुती करणार आहे तुमचे पवित्र मत त्यांना द्यायचे आहे. उद्याचा महायुतीचा जो उमेदवार जो कोणी असेल त्याला मतदान करा. त्याची निशाणी घड्याळ असेल. विकासासाठी घड्याळालाच मतदान करा. असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

यावेळी कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रदीप गारटकर , महीला अध्यक्षा रुपाली चाकणकर , जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरे , जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विक्रम खुटवड , जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चंद्रकांत बाठे , पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भालचंद्र जगताप , तालुका अध्यक्ष संतोष घोरपडे, केदार देशपांडे, गणेश निगडे, स्वप्नील कोंडे, कुणाल धुमाळ, किर्तीताई देशमुख, विद्याताई पांगारे तसेच भोर वेल्हे तालुक्यातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भेकराईनगर फुरसुंगी भागातील नागरी समस्या सुटणार कधी, हडपसर क्षेत्रीय अधिका-यां समोर मांडल्या व्यथा

**हडपसर :** हडपसर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भेकराईनगर फुरसुंगी भागातील प्रभागात सध्या अनेक विविध समस्यां वाढल्या असून पाणी, ड्रेनेज, कचरा, रस्ता,लाईट,आरोग्य आदी विविध मुलभूत समस्यां वाढल्याने रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड( आठवले) पुणे शहर अध्यक्ष सुरज गायकवाड यांनी हडपसर क्षेत्रीय कार्यालयातील विविध खात्यातील मनपा अधिकारी यांना फुरसुंगी.ग्रामपंचायत कार्यालयात समस्यां विषयी चर्चा बैठक गावकरी व मनपा अधिकारी यांच्यात आयोजित करण्यात आली होती, या चर्चेत फुरसुंगी गावात सध्या पाणी टंचाई भासत असल्याने पाणी प्रश्न सोडविण्यात यावा, कचरा व ड्रेनेज सफाई करण्यात यावी,नागरीकांच्या आरोग्यासाठी मनपाचा दवाखाना उघडण्यात यावा, रस्ते दुरुस्ती करण्यात यावी, लाईट विद्युत



प्रकाश व्यवस्था करण्यात यावी, आणि आमच्याकडून मनपा पुर्ण टॅक्स कर आकारते मग तशा संपुर्ण सोयीसुविधा उपलब्ध करून का देत नाही आणि रिपाइं श्रमिक ब्रिगेडने केलेल्या आंदोलनातील विविध प्रलंबित मागण्या का मार्गी लागत नाहीत अशा विविध विषयांवर बैठकीत सुरज गायकवाड व ग्रामस्थ यांनी हडपसर क्षेत्रीय कार्यालयाचे मनपा सह्या.आयुक्त बाळासाहेब ढवळेपाटील यांच्याशी चर्चा करीत व्यथा मांडल्या.या बैठकीस महापालिकेचे विविध खात्याचे अधिकारी उपस्थित होते.यात उप अभियंता प्रतिक दळवी,विद्युत विभागाचे उपअभियंता धाबेवार साहेब ,पाणीपुरवठा विभागीचे उप अभियंता मोराळे साहेब ,कनिष्ठ अभियंता निखिल घरत ,आरोग्य विभाग दत्तात्रय पोळ, उपअभियंता पोर्णिमा गायकवाड मॅडम. ग्रामस्थ विशाल हरपळे,प्रल्हाद कामठे,रत्नाकर फाटे,गोरख कामठे,उमेश पवार,संतोष अबनावे, महादेव कांबळे, अजित पवार,भाऊसाहेब पवार,साई चंद,सिध्देश्वर गायकवाड,सनी वाघमारे,रोहित शिंदे,फुरसुंगी गावातील नागरीक उपस्थित होते.

यावेळी ढवळेपाटील म्हणाले की, फुरसुंगी भागातील विविध समस्यां लवकरच मार्गी लावण्यात येतील, फुरसुंगी गाव सध्या महापालिकेत आहे, नगरपालिका की महापालिका याचा निर्णय वरिष्ठ घेतील आम्ही मुलभूत सुविधां देण्यास कटिबद्ध आहोत.

यावेळी नागरीक.म्हणाले की,आम्ही नेमके महापालिकेत आहोत का नगरपालिकेत हेच कळत नाही अगोदर एकच फैसला करावा मगच आमच्याकडून कर टॅक्स आकारावा मनपा आम्हाला मुलभूत सुविधां पुरवित नाही तर पुर्ण कर आकारण्यात येऊ नये अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली.

सुरज गायकवाड म्हणाले की , आमच्या आंदोलनातील संपुर्ण विविध मागण्या मान्य न झाल्यास फुरसुंगी भागातील विविध समस्यांसाठी मोठे जनआंदोलन करु.

# तणाव व्यवस्थापन कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त : रितू सिंग

**पिंपरी चिंचवड :** आयआयबीएम कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट आणि पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी तणाव व्यवस्थापन (स्ट्रेस मॅनेजमेंट) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत रितू सिंग (योग आणि आहारतज्ज्ञ) यांनी विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना तणाव व्यवस्थापन तंत्रांबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थी आणि प्राध्यापकांना तणावाचे व्यवस्थापन कसे करावे याबद्दल माहिती देवून तणाव कमी करण्यासाठी आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी विविध तंत्रांचा सराव करावा. योगासने आणि ध्यानधारणा यांचा तणाव कमी करण्यासाठी उपयोग कसा करावा, याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली.



संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर, प्राचार्य प्रदीप फुलकर, विभाग प्रमुख अमोल भागवत, अनिकेत वंजारी, प्रतीक्षा डफल, पीसीएमसी स्मार्ट सारथी टीमचे अधिकारी बिनीश सुरेंद्रन, किरण लवटे, जस्टिन मॅथ्यू आणि आशिष चिकणे यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे संयोजन ट्रेनिंग आणि प्लेसमेंट कॉर्डीनेटर गरिमा मलिक यांनी केले. मिलिंद तायडे आणि एकता सिंग यांनी पाहुण्यांचे स्वागत आणि आभार व्यक्त केले. तणाव व्यवस्थापन कार्यशाळा विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी उपयुक्त ठरली.

# भागडी जि.प. शाळेत मराठी भाषा दिन उत्साहात साजरा



**वळती :** मराठी भाषा दिनानिमित्त भागडी (ता. आंबेगांव )च्या जिल्हा परिषद शाळेत मराठी भाषा दिन वि .वा .शिरवाडकरांच्या प्रतिमेचे पुजन करून मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला . याप्रसंगी इनरव्हिल क्लब मंचरच्या अध्यक्षा डॉ .मेघा गाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले , की विद्यार्थ्यांनी संस्कृती व वाचनाचा छंद व वाचन करून नोंदी ठेवाव्यात , साहित्य कलेची आवड निर्माण करावी त्यामुळे जिवनाचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही . तसेच त्यांनी कुसुमाग्रजांची कविता सादर केली . मराठी भाषा दिनाचे औचित्य साधुन डॉ.गाडे यांनी शाळेसाठी पाच व्हाईट बोर्ड प्रदान केले. तसेच भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप केले . डॉ. गाडे यांनी पाचवीच्या होणाऱ्या शिष्यवृत्ती परिक्षेत गुणवत्ता धारक प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले .

डॉ .ज्योती वाघ यांनी विद्यार्थ्यांना आरोग्या विषयी मार्गदर्शन करताना सांगितले की , आरोग्य व घ्यावयाचा चौरस आहार , अभ्यासाचे महत्व व घरातीलच पदार्थ खावेत ,बाहेरील पदार्थ टाळावेत . अभ्यास करून उज्वल यश संपादन करावे व आई - वडीलांचे आज्ञा पालन करावे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक विजय गाडे उपस्थित होते .

मुख्याध्यापक बाळासाहेब गिलबिले म्हणाले , मराठी भाषा गौरवदिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले गेले आहेत. आपल्या मातृभाषेला गौरव म्हणून व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवसाचे महत्व विशद केले . यावेळी कृतिका आदक ,समिक्षा आगळे ,समिक्षा उंडे यांनी मराठी भाषेविषयी माहिती सांगीतली . तर विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कविता सादर केल्या . कार्यक्रमाचे नियोजन आशा वाळके व लालन गायकवाड यांनी केले सिध्दी रावळ यांनी सुत्रसंचलन तर स्वाती शिंदे यांनी आभार मानले .

# नदी संवर्धन व स्वच्छता प्रकल्प उपक्रम एकदिवसीय कार्यशाळा सांगावी येथे संपन्न

**वडगाव मावळ :** येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे व श्री.संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व बी.बी.ए महाविद्यालय वडगाव-मावळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये नदी संवर्धन व स्वच्छता प्रकल्प उपक्रमांतर्गत एकदिवसीय कार्यशाळा रविवार दिनांक.२५ र इंद्रायणी तीरी, जाखमाता मंदिर, सांगवी ता.मावळ, जि.पुणे या ठिकाणी संपन्न झाली.

एकदिवसीय कार्यशाळेचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष मा.श्री तुकारामजी असवले साहेब होते. कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे सचिव मा.श्री.अशोक बाफना साहेब यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेचे प्रमुख वक्ते मा.डॉ.पवन शिनगारे सर (राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे, जिल्हा समन्वयक) उपस्थित होते. महाविद्यालायचे मा.प्राचार्य श्री.अशोक गायकवाड सर उपस्थित होते. खट-उ समन्वयक मा.डॉ. शीतल दुर्गाडे मॅडम उपस्थित होते. सोबत सर्व विभागप्रमुख व सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

महाविद्यालय ते पोटोबा मंदिरापर्यंत नदीसंवर्धन विषयीचे घोषणा फलक हाती घेऊन स्वच्छतेची प्रभातफेरी काढण्यात आली. एक दिवसीय कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व सर्व प्राध्यापकांनी एकत्रित मिळून इंद्रायणी नदी मधील अनावश्यक पणे विस्तारलेली घातक जलपर्णी प्रत्यक्षपणे पाण्यात उतरून पंजा व फावडे या साहित्याच्या मदतीने काढून टाकली.

एकदिवसीय कार्यशाळेचे प्रमुख वक्ते मा.डॉ.पवन शिनगारे सर यांनी पाण्याचे महत्व, नदी स्वच्छता, नदी संवर्धनावरील उपाययोजना, याविषयीचे मार्गदर्शन केले. आणि आज आपला वर्तमानकाळ नैसर्गिक दृष्ट्या सुसंपन्न ठेवला तरच भविष्यकाळ बलवान होऊ शकतो असा बहुमौलिक संदेश दिला.

कार्यशाळेच्या अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना बहुमौलिक मार्गदर्शन केलेकार्यक्रमाचे उद्घाटक संस्थेचे मा.श्री. अशोकजी बाफना साहेब यांनी या उपक्रमाबाबत विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे कौतुक केले.



# मावळातील सहा साकव पुलांसाठी २ कोटी ६० लाखांचा निधी

**वडगाव मावळ :-** मावळ मतदारसंघाचा विकास करत असताना वाड्या-वस्त्यांवरही विकासकामे पोहोचवण्याचे कार्य आमदार सुनिल शेळके यांनी सातत्याने सुरु ठेवले आहे. तालुक्यातील सहा साकव पुल बांधण्यासाठी २ कोटी ६० लक्ष निधी आमदार शेळके यांच्या प्रयत्नातून उपलब्ध झाला आहे.

ग्रामीण भागातील छोटे ओढे, नाले अशा ठिकाणी वाड्या-वस्त्यांना मुख्य गावाशी जोडणाऱ्या रस्त्यांवर पुल नसल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत होती,ही



अडचण ओळखून आमदार शेळके यांनी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत सहा साकव पुल नव्याने बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला आहे.

यामध्ये ३५ लक्ष निधीमधून आढले बु.येथे भगतवस्ती ते डोणे रस्त्यावर साकव बांधणे, ६० लक्ष निधीतून कोथुर्णे येथे ब्राम्हणोली रस्त्यावर साकव बांधणे, ३५ लक्ष निधीतून पाचाणे आगळे वस्ती रस्त्यावर साकव बांधणे, ३५ लक्ष निधीतून पाचाणे खिलारेवस्ती रस्त्यावर साकव बांधणे, ३५ लक्ष निधीतून बेबडओहोळ ते ठाकर वस्ती रस्त्यावर साकव बांधणे, ६० लक्ष निधीतून शिवली ते येलघोल रस्त्यावर खडकवाडी अशा सहा ठिकाणी साकव पुल बांधण्यात येणार आहेत.

अनेक वर्षांपासून ग्रामस्थांकडून होत असलेल्या मागणीनुसार वाड्या-वस्त्यांना गावांशी जोडणारे साकव पूल होणार असल्याने स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी यांची गैरसोय दूर होणार आहे.व ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होण्यास मदत होईल.

साकव बांधणे कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला प्रारंभ करावा व कामे दर्जेदार करून लवकरात लवकर पूर्ण करावीत अशा सूचना आमदार सुनिल शेळके यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# रास्ता रोको आंदोलन केल्याप्रकरणी हडपसर पोलीस स्टेशनमध्ये मराठा कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल

**हडपसर :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांच्या समर्थनात हडपसर मांजरी फाटा चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते आंदोलन केल्याप्रकरणी सुमारे २० मराठा आंदोलन कर्त्यांविरोधात हडपसर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंदोलनाच्या दिवशी प्रतिबंधात्मक कारवाई केलेली असताना पोलिसांकडून दोन दिवसानंतर गुन्हा दाखल झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

संदीप लहाने पाटील, महेश टेळे पाटील, बाळासाहेब भिसे, अनिल बोटे, कुणाल मोरे, विजय भाडळे, रमेश तुपे यांच्यासह १० ते १५ अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू होते, जरांगे व समन्वयक समितीच्या आदेशानुसार महाराष्ट्रात ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते यामध्ये पुण्यात हडपसर मांजरी फाटा चौकात सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून प्रतिकात्मक रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, आंदोलकांना हडपसर पोलिसांनी ताब्यात घेतले त्यानंतर नोटीस देऊन, प्रतिबंधात्मक कारवाई करून सोडण्यात आले.

रास्ता रोको आंदोलन केले म्हणून आमच्या विरोधात हडपसर पोलिसात गुन्हा दाखल झाल्याने राजकीय षडयंत्र करून वरिष्ठांच्या आदेशानुसारच कारवाई झाल्याचा आरोप सकल मराठा समाजाचे समन्वयक संदीप लहाने पाटील यांनी केला आहे. मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक संदीप लहाने पाटील महेश टेळे पाटील, बाळासाहेब भिसे, अनिल बोटे, कुणाल मोरे, विजय भाडळे, रमेश तुपे व त्यांच्यासोबत दहा ते पंधरा इसम यांनी मांजरी फाटा चौकात जमून घोषणा दिल्या पोलीस उपायुक्त विशेष शाखा पुणे शहर यांच्या जमावबंदीच्या आदेशाचा भंग केला म्हणून भादवि कलम १४३ सह महाराष्ट्र पोलीस कलम १३५ प्रमाणे फिर्याद दाखल करण्यात आली आहे. अशी माहिती हडपसरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांनी दिली. हडपसर मध्ये पोलिसांना पत्र देऊन शांततेच्या मार्गाने रास्ता रोको आंदोलन केले होते, त्यावेळी आमच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई होऊन सुद्धा पोलिसांनी गुन्हे दाखल केले, आम्ही मनोज जरांगे यांच्या पाठीशी ठामपणे उभा असून समाजाच्या न्याय हक्कासाठी मराठा आरक्षण मागण्यासाठी किती गुन्हे दाखल झाले तरी मागे हटणार नाही असे संदीप लहाने पाटील, महेश टेळे पाटील व बाळासाहेब भिसे यांनी हडपसर पोलिसांवर नाराजी व्यक्त करीत सांगितले.

# शिक्षण हक्क कायद्यात बदल करण्याची महापॅरेंट्स संघटन तर्फे मागणी

**पुणे :** सरकारी शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षण हक्क कायद्यात बदल करून २५% गोरगरीब आणि गरजवंत मुलांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला असा आरोप करून महापॅरेंट्स पालक संघटनेतर्फे राज्य सरकारच्या या कृतीचा तीव्र आणि जाहीर निषेध करण्यात आला.

शिक्षण हे जग बदलण्याचे प्रभावी शस्त्र आहे असे असले परंतु आज महाराष्ट्रातील गोरगरीब विद्यार्थ्यांना आपल्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्या पासून वंचित ठेवले जात आहे. राज्य सरकारने खाजगी विनाअनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या शाळांमध्ये जे विद्यार्थी आरटीई च्या माध्यमातून २५% विद्यार्थी शिकत होते, त्या विद्यार्थ्यांची प्रतिपुरर्ती शुल्क,आजही राज्य सरकारने त्या शाळांना दिलेले नाहीत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण हे अधान्तरीच अडकलेले आहे. त्यामुळे राज्य सरकारने असले कोणतेही निर्णय घाई गडबडीत घेण्यापूर्वी,पालकांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. परंतु असे होताना बिलकुल दिसत नाही. म्हणून महापेरेंट्स या पालक संघटनेच्या वतीने राज्य सरकारकडे या विविध मागण्या संदर्भात जिल्हा अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. राज्य सरकारने पालकांच्या या ज्वलंत प्रश्नावर त्वरित लक्ष घालावे.अन्यथा पालकांना रस्त्यावर येऊन पुन्हा एकदा संघर्ष करेल. याबाबतचे महापेरेंट्स पालक संघटनेच्या शिष्टमंडळाच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी ज्योती कदम यांना निवेदन देऊन त्यांच्याशी



सविस्तर चर्चा करण्यात आली. या शिष्टमंडळात दिलीप सिंग विश्वकर्मा, दत्तात्रय पवार, डॉक्टर संजय कुंबरे, हर्षल भुमकर, सुयोग तांबोळी, उदय गडकरी, अविनाश माने, ड. सनी साबळे सह अनेकांचा सहभाग होता.

**महापेरेंट्स या पालक संघटनेच्या विविध मागण्या**

सरकारी शाळांतील पटसंख्या वाढविण्यासाठी आरटीई नियमात शासनाने जो बदल केलेला आहे तो बदल त्यांनी त्वरित मागे घ्यावा.

आर टी इ च्या माध्यमातून खाजगी विनाअनुदानित शिकणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे प्रतिपूर्ती शुल्क शासनाने त्या शाळांना त्वरित द्यावे.

राज्यातील सरकारी शाळेची परिस्थिती अत्यंत दयनीय अशी आहे त्यासाठी चांगले शिक्षक नेमणे गरजेचे आहे.

या शाळांमधील २५% शिक्षक हे शाळेतच येत नाहीत,आणि २५% पदे ही भरलेली नाहीत.अनेक ठिकाणी तर मुख्याध्यापक हे पद सुद्धा रिक्तच असते. त्यामुळे सर्व प्रथम सरकारने शिक्षकांच्या रिक्त पदांची भरती केली पाहिजे.

अनेक शाळांमध्ये मुलांना खेळायला ग्राउंड नाही. चांगल्या लॅब नाहीत चांगले संगणक नाहीत,असतील तर चालूच नसतात.पिण्याचे स्वच्छ पाणी नाही. स्वच्छतागृहांची व्यवस्था नाही. असतील तर ती अत्यंत अस्वच्छ आहेत. सर्वप्रथम विद्यार्थ्यांना सरकारने या सुविधा पुरवल्या पाहिजेत.

राजकारणाची मुले ही सरकारी शाळेत शिकत नाहीत.त्याचबरोबर या सरकारी शाळेत किंवा अनुदानित शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांची मुले ही देखील खाजगी शाळेत शिकत असतात. राजकारणी यांची मुले आणि सरकारी किंवा अनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या सरकारी शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांनी शक्तीने आपल्या मुलांना सरकारी शाळेतच शिकवले पाहिजे,असा अध्यादेश राज्य सरकारने त्वरित काढावा.

तसेच शहरातील सरकारी शाळा अनुदानित शाळा यांची गुणवत्ता कायम टिकून ठेवण्यासाठी एका दक्षता समितीची नेमणूक करावी.

महानगरपालिकेतील आणि जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी सर्वप्रथम सी बी एस सी आय सी एस सीआय बी या सारख्या बोर्डाच्या मान्यता आणून, महापालिकेतील आणि जिल्हा परिषद येथील शाळां मधील विद्यार्थ्यांना मोफत असे दर्जेदार शिक्षण देण्यात यावे.

ज्या खाजगी विनाअनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या शाळांना राज्य सरकारने अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी जमिनी दिलेल्या आहेत,तसेच ज्या शिक्षण संस्था स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिलेल्या सवलतीचा वापर करतात,अशा सर्व शाळाना २५% शिक्षण शुल्क हक्क कायदा हा लागू झाला पाहिजे.



# हडपसरमध्ये माजी विद्यार्थांचा स्नेह मेळावा संपन्न

हडपसर : हडपसर मधील सावित्रीबाई फुले विद्यानिकेतन शाळा क्रमांक ४, हडपसर गाडीतळ या शाळेचा माजी विद्यार्थी स्नेह मेळावा संपन्न झाला.

सन १९९९ ते २००२ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित केला होता. या स्नेह मेळाव्याला त्यांचे माजी शिक्षक कुंजीर सर, शिंदे सर आणि कोल्हे सर आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते. शाळेत आल्यानंतर पुन्हा सर्व शालेय मित्रांना आणि शिक्षकांना भेटून जुन्या आठवणींना उजाळा देत कार्यक्रमांमध्ये खेळ, गाणी, गप्पागोष्टी आणि जेवणाचा आस्वाद सर्वांनी घेत स्नेहमेळावा कार्यक्रम उत्साही वातावरणात हडपसर येथे पार पडला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप झेंडे आणि करण गायकवाड यांनी केले.तर कार्यक्रमाचे आयोजन विपुल जाधव, विजय राऊत, विनोद पवार आणि किर्ती मुनोत यांनी केले होते.

माजी विद्यार्थी मेळाव्यात प्रत्येकानी शालेय जीवनातील विविध घडलेल्या, आठवणीना उजाळा देत मागील दिवस. आता पुढे येणे नाही, कोण कुठे राहातो जग खुप पुढे चालले तसा आठवणी ही पडद्या आड होत एकमेकांचा असलेला ऋणानुबंध तुटत चालला असल्याचे आणि सर्व आठवणींने कंठ दाटून येतो असे अनेकांनी आपला अनुभव कथन करत स्नेह मेळाव्यात बोलत होते.स्नेह.मेळावा उत्साही वातावरणात संपन्न झाला.

# पवई तलावातील जलपर्णी काढण्यासाठी ११ कोटी



**मुंबई:** पवई तलावातील वाढत्या जलपर्णी ही मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. जलपर्णीमुळे तलावाच्या सौंदर्याला बाधा निर्माण झाली आहे. त्यामुळे या जलपर्णी आणि तलावातील टाकाऊ पदार्थ काढून टाकण्याची योजना पालिकेने हाती घेतली आहे. हार्वेस्टर यंत्र व एमफीबियस यंत्राच्या मदतीने जलपर्णी काढून टाकल्या जाणार आहेत. त्यासाठी तब्बल सव्वा अकरा कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

पवई तलाव हा पूर्व उपनगरातील मुख्य पर्यटन स्थळ आहे. या तलावाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. तलावाचा परिसर अत्यंत सुंदर करण्यात आला असून त्या ठिकाणी आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे या ठिकाणी पर्यटकांचा ओढा वाढला आहे. रेतीच्या वेळेस तर या ठिकाणी फेरफटका मारण्यात वेगळाच आनंद मिळतो. मात्र तलावातील जलपर्णी वाढल्याने तलावाचे सौन्दर्य बाधित झाले आहे. त्यामुळे तलावाचे सौन्दर्य अबाधित राखण्यासाठी तसेच तलावातील जैव विविधतता जतन करण्यासाठी- संवर्धन करण्यासाठी सफाई मोहीम हाती घेतली जाणार आहे.विशिष्ट यंत्रांच्या सहाय्याने जलपर्णी तसेच टाकाऊ पदार्थ बाहेर काढल्यानंतर त्यांची डम्पिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावली जाईल. या कामासाठी एस.के. डेव्हलपर्स या कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून त्याने ८ कोटी ३७ लाख रुपयांची बोली लावून कंत्राट मिळवले आहे. विविध करांसह कंत्राटाची एकूण रक्कम ११ कोटी १८ लाख एवढी आहे. जलपर्णी काढण्याचे काम सहा महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित आहे. त्यानंतर पुढील १८ महिने तलावाची देखभालही करायची आहे.यापूर्वी २०१२ मध्ये जलपर्णी काढण्याचे कंत्राट देण्यात आले होते. मात्र त्यानंतर पुन्हा जलपर्णी वाढली आहे.

० जलपर्णी घातक जलपर्णीची बेसुमार वाढ झाली की ती पाण्याचा पुष्ठभाग झाकून टाकते. त्यामुळे तलावातील जैव विविधततेपर्यंत सूर्यप्रकाश पोहोचण्यात अडथळा निर्माण होतो.

त्यामुळे माशांचे खाद्य असणाऱ्या वनस्पतींची वाढ खुंटते. तसेच तलावाच्या पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन तापमानात फरक पडतो. जलपर्णीमुळे डासांची उत्पत्ती होते. ० दूषित पाण्याचा निचरा तलावातील दूषित पाणी कमी करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्याशिवाय सांडपाण्याचा निचरा कमी करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी स्वतंत्रपणे कार्यवाही केली जात आहे.

# माढ्यात रासपची खेळी, भाजपात वादळ

**सातारा :** लोकसभेची निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच माढ्यात महायुतीत बेसूर असून रासपनेही स्वतंत्र लढण्याचे जाहीर केले आहे. यामुळे भाजपात वादळ उठणार आहे. तर या राजकीय घडामोडीतमहाविकास आघाडीतमहादेव जानकरयांना घेण्याच्या हालचाली वाढल्याची माहितीही मिळत आहे. त्यामुळे माढ्याचा तिढा भाजपसाठीतरी वाढणार असल्याचे संकेत सध्यस्थितीततरी दिसत आहेत.






२००९ पासूनमाढालोकसभा मतदारसंघ अस्तित्वात आला. सोलापूर जिल्ह्यातील चार आणि साताऱ्यातील दोन विधानसभा मतदारसंघाचा समावेश या लोकसभेसाठी आहे. हा मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासूनच चर्चेत आहे. आतापर्यंतच्या तीन निवडणुकीत राजकीय संघर्षच पाहावयास मिळाला. कारण संपूर्ण मतदारसंघात राज्यातील दिग्गज नेते आहेत. प्रत्येकाचा सवतासुभा आहे. राजकीय पक्षापेक्षा त्यांची स्वत:ची व्होट बँक आहे. त्यामुळे हा मतदारसंघ नेहमीच चर्चेत राहिला. आताही तशीच स्थिती निर्माण झालेली आहे.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू शकते. त्यापूर्वीच माढ्याचे राजकारण तापले आहे. मतदारसंघ पुन्हा ताब्यात ठेवण्यासाठी भाजप तयारीत आहे. यासाठी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी पूर्ण तयारी केली आहे. पण, त्यांच्या वाटेत महायुतीतून काटे पेरले जात आहेत. राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) व विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी त्यांना आव्हान दिले आहे. दोघांतील वाद युतीत असूनही कमी झालेला नाही. त्यातच रामराजेंनी भाऊ संजीवराजे नाईक-निंबाळकर यांच्यासाठी तयारी केली आहे.

त्याचबरोबर माळशिरस विधानसभा मतदारसंघातील माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, त्यांचे सुपूत्र आमदार रणजितसिंह यांनी मागील निवडणुकीत खासदार रणजितसिंह यांच्यासाठी खूप मेहनत घेतली. पण, दोघांतही सख्य राहिलेले नाही. त्यातच विजयसिंह मोहिते यांचे पुतणे धैर्यशील मोहिते हे भाजपमध्ये आहेत. त्यांनाही खासदार व्हायचे आहे. यासाठी मतदारसंघात त्यांनी संपर्क वाढवलाय. भाजपने उमेदवारी दिलीतर ठीक नाहीतर त्यांनी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाशी संपर्क वाढविल्याचीही माहिती मिळत आहे. त्यामुळे भाजपची नौका या वादळात किनारा गाठणार का ? अशी स्थिती आहे. असे असतानाच आता माजी मंत्रीमहादेव जानकरयांनी नवा डाव टाकला आहे.रासपचे अध्यक्ष असलेले महादेव जानकर हे माण तालुक्यातील आहेत. त्यांना लोकसभेत जाण्याचे वेध लागले आहे. महायुतीत असूनही त्यांनी स्वतंत्र लढण्याचे जाहीर केले आहे. त्यांची ही खेळी भाजपला अडचणीत टाकणारी आहे. रासपला या मतदारसंघात टाळणे किंवा दुर्लक्षित करणे भाजपला महागात पडू शकते. कारण, रासपची ताकद मतदारसंघात नक्कीच आहे. २००९ च्या निवडणुकीत पक्षाची ताकद कमी असतानाही जानकर यांनी शरद पवार यांच्याविरोधात लढून एक लाख मते मिळवली होती. त्यावेळी भाजपचे उमेदवार सुभाष देशमुख यांना दोन लाखांवर मते घेता आली होती. आज जानकर यांच्या नवीन खेळीचा भाजपला विचार करावाच लागणार आहे.

त्याचबरोबर सध्यामहाविकास आघाडीकडेतगडा उमेदवार नाही हेही सत्य आहे. आघाडीत मतदारसंघ राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडे राहील. त्यांच्याकडून अभयसिंह जगताप यांनी जोरदार तयारी केली असलीतरी महाविकास आघाडीत जानकर यांना घेण्याच्या हालचालीही सुरू आहेत. शरद पवार यांच्याशीही त्यांची बातचित झाल्याची माहितीही मिळत आहे. त्यामुळे शरद पवार भाजपला रोखण्यासाठी स्वत:चा मतदारसंघ रासपला देऊन ताकदही लावतील. त्यामुळे भाजपच्या राज्यातील ४५ हून अधिक जागा जिंकण्याच्या दाव्याला खिळ बसू शकते. तरीहीमाढानिवडणुकीचे चित्र स्पष्ट होण्यासाठी अजून बऱ्याच घडामोडी होणार होऊ शकतात हे निश्चित आहे.

# राज्यातील ४ लाख तरुणांना प्रशिक्षित करून रोजगार देणार : मुख्यमंत्री

**मुंबई :** बेरोजगारीवर मात करण्यासाठी शासन प्रमाणिक प्रयत्न करत आहे.महाराष्ट्रशासनाने नुकताच जर्मनीबरोबर सामंजस्य करार केला असून यामाध्यमातून ४ लाख बेरोजगार तरूणांना प्रशिक्षण देऊननोकरीदिली जाणार आहे. दावोस येथे झालेल्या गुंतवणूक परिषदेत ३ लाख ७३ हजार कोटींचे करार करण्यात आले असून यातून २ लाख तरूणांना रोजगार निर्माण होणार आहे. राज्यात सुरू असलेल्या विभागीय नमो महारोजगार रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून २ लाखांपेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार, असे मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेम्हणाले. अहमदनगर येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभाग विभागीय नमो महारोजगार मेळावा



व करिअर मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून थेट सहभागी होत मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी भाष्य केले. त्यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले, शासन हे सर्वसामान्य लोकांचे आहे. तरूणांना रोजगार देण्यासाठी शासन प्रामाणिक प्रयत्न करत आहे. राज्यात सर्व विभागात रोजगार मेळावे आयोजित केले जात आहेत. येत्या काळात बेरोजगार तरूणांच्या दारात जाऊन शासन त्यांना रोजगार उपलब्ध करून देणार आहे. शासन आपल्या दारी उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात अडीच कोटी लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला. अशाच प्रकारे रोजगार मेळाव्यातून लाखो तरूणांना रोजगार मिळून तरूण त्यांच्या पायावर उभे राहून सक्षम होणार आहेत.याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ध्वनीमुद्रीत दृकश्राव्य संदेशाच्या माध्यमातून शुभेच्छा संदेश दिला. ते म्हणाले की, राज्य शासन सातत्याने कौशल्य विकासावर भर देत आहे. राज्यात दोन हजार प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात घेण्यात आला. ३४ जिल्ह्यातील २५० तालुक्यातील ५११ गावात या केंद्रांची स्थापना करण्यात येत आहे. या केंद्रातून दरवर्षी ५० हजार तरुण- तरुणींना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने ग्रामीण भागात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. प्रत्येक उद्योग व रोजगारक्षम युवा यांच्या संवादातून सुद्धा अनेक संधी निर्माण होत असतात. रोजगार मिळणे हे कुटुंबाच्या समृद्धीसाठी अत्यंत आवश्यक असते. या रोजगार मेळाव्यात प्रत्येकाला आपल्या गुणवत्तेनुसार, कौशल्याप्रमाणे रोजगार मिळेल. हा नमो महारोजगार मेळावा अनेक युवक-युवतींना आपल्या पायावर उभा करणारा ठरेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री लोढा म्हणाले की, पंधरा दिवसांच्या आत राहाता (शिर्डी) व अहमदनगर येथे संत गाडगेबाबा कौशल्य प्रबोधनी सुरू करण्यात येईल. एक महिन्याच्या आत अहमदनगर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास संस्था सुरू करण्यात येईल. या संस्थेच्या माध्यमातून कौशल्याबरोबर परदेशी भाषेचे शिक्षण दिले जाईल. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात एक आयटीआय सुरू करण्यात येऊन युवकांना १५ दिवसाचा कौशल्य अभ्यासक्रम शिकविण्यात येईल.

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, औद्योगिककरणाच्या दृष्टीने आपण मोठे पाऊल उचलले आहे. वर्षभरात दीड हजार एकर जमीन अहमदनगर जिल्ह्यात उद्योगांसाठी देण्यात आले. ५ हजार १४ कोटींचे सामंजस्य करारातून २३ हजार रोजगाराची निर्मिती होणार आहे. जिल्ह्यातील औद्योगिक परिसरातील शांततेसाठी जिल्हा प्रशासन कटीबद्ध आहे. अहमदनगर जिल्हा सहा राष्ट्रीय महामार्गाने जोडला गेला आहे. जिल्ह्यातील तरूणांना जिल्ह्यातच रोजगारासाठी आमचा प्रयत्न आहे.

# मराठी भाषेचा प्रसार आणि प्रचार होणे गरजेचे : चंद्रकांत भाट

**शिरोळ :** कवी कुसुमाग्रज यांनी आपल्या शैलीदार लेखणीतून मराठी भाषेला सर्वोच्च स्थान प्राप्त करून दिले त्यामुळे मराठी भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले या भाषेचा प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन पत्रकार चंद्रकांत भाट यांनी केले

विजयसिंह पाटील शिक्षण प्रसारक मंडळ आगरभाग शिरोळ संचलित न्यू इंग्लिश स्कूल मौजे आगर विद्यालयात मराठी राजभाषा दिन तथा कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्सहात संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार चंद्रकांत भाट बोलत होते

यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव मेजर के. एम् भोसले खजिनदार कृष्णात पाटील , संचालक सुरेश पाटील पत्रकार बाळासाहेब कांबळे विद्यालयाचे मुख्याध्यापक खंडेराव जगदाळे , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पुजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली .स्वागत विद्यालयाचे पृथ्वीचंद माछरेकर यांनी केले तर प्रास्ताविक विद्यालयाचे नितिन बागुल यांनी केले. कु. सानिका पाटील हिने कुसुमाग्रजांचे ओंकार लाड साद शेख महेक शेख , हिरकणी कोळी वैष्णवी शिंदे , तहुरा मुल्ला इत्यादी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले .

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पत्रकार चंद्रकांत भाट यांनी कुसुमाग्रज यांच्या जिवन कार्याची माहिती देतांना विविध दृष्टांत देऊन विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले .मराठी भाषा वाढली पाहिजे तीचा प्रसार व प्रचार झाला पाहिजे असे प्रतिपादन केले . शेवटी आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव मेजर के. एम्. भोसले यांनी केले.

# साताऱ्यासह सांगली, कोल्हापूर लोकसभेसाठी साताऱ्यात उद्या काँग्रेसची बैठक

**सातारा :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सातारा, सांगली आणि कोल्हापूर मतदारसंघाबाबत चर्चा आणि आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसच्या विधानसभा निरीक्षक, तालुकाध्यक्षांची ... साताऱ्यासह सांगली, कोल्हापूर लोकसभेसाठी साताऱ्यात उद्या काँग्रेसची बैठक

याबाबत माहिती अशी की, प्रदेशकाँग्रेसकमिटीच्यावतीने आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री सतेज पाटील आणि विश्वीजत कदम यांच्या सूचनेवरुन विधानसभा मतदारसंघ प्रभारींची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील निरीक्षक आणि तालुकाध्यक्षांची महत्वपूर्ण बैठक दि. २९ फेब्रुवारीला सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीत होणार आहे.

या बैठकीत लोकसभा मतदारसंघाचा आढावा काँग्रेसच्या सचिव सोनलबेन पटेल या घेणार आहेत. यावेळी काँग्रेसचे सातारा जिल्हा प्रभारी श्रीरंग चव्हाण-पाटील, सातारा जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, ज्येष्ठ नेते ॲड. विजयराव कणसे, अजितराव पाटील-चिखलीकर, रणजितसिंह देशमुख, राजेंद्र शेलार, काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा अल्पना यादव आदी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, गुरुवारी सकाळी ११ ला सातारा जिल्ह्याची बैठक होणार आहे. तर दुपारी एक ते तीन वाजेपर्यंत सांगली जिल्हा आणि त्यानंतर साडे तीन ते पाच वाजेपर्यंत कोल्हापूर जिल्ह्याची आढावा बैठक होणार आहे. या बैठकीला उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई यांनी केले आहे.

# मोरया प्रतिष्ठानतर्फे आमदार सुनील शेळकेचा नागरी सत्कार

**वडगाव मावळ :** वडगाव नगरपंचायत हद्दीतील विविध विकासकामांना कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मोरया प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने आमदार सुनील शेळके यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

वडगाव-कातवीच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिल्याबद्दल आमदार शेळके यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी मोरया प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला शंकर महाराज मराठे, तुषार महाराज दळवी, भंडारा डोंगर दशमी समितीचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद, नितीन महाराज काकडे, भाऊसाहेब टाकळकर, जिल्हा बँकेचे संचालक माऊली दाभाडे, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष बाळासाहेब ढोरे, ज्येष्ठ नेते मंगेश ढोरे, सुभाष जाधव, अरुण चव्हाण, सारिका शेळके,



राष्ट्रवादी काँग्रेस महिलाध्यक्षा दीपाली गराडे, बापूसाहेब वाघवले, सुनील चव्हाण, नंदाताई ढोरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजक मयूर ढोरे म्हणाले की, ''आमदार सुनील शेळके यांनी गेल्या चार वर्षात वडगाव नगरपंचायतीला कोट्यवधी रुपयांचा निधी दिल्याने जवळपास ९० टक्के विकासकामे मार्गी लागली आहेत. येत्या आठवडाभरात अजून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार आहेत.''

आमदार शेळके म्हणाले की, ''तालुक्याचे प्रशासकीय शहर असलेल्या वडगाव ग्रामपंचायतीचे पाच वर्षांपूर्वी नगरपंचायतमध्ये रूपांतर झाल्यानंतर शहराचा नियोजनबद्ध विकास होत आहे. मुख्य रस्त्यासह सर्व प्रभागातील अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण तसेच डांबरीकरण करणे, हायमास्ट सौर दिवे बसविणे, नगरपंचायत इमारत बांधणे, अग्निशमन वाहन उपलब्ध करणे, विद्युत शवदाहिनी बसविणे, बंदिस्त ड्रेनेज लाइन इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

वडगाव शहराची ४० कोटींची स्वतंत्र पाणी योजनेला तांत्रिक मंजुरी मिळाली असून पुढील महिन्यात पाणी योजनेच्या कामाला देखील प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे. वडगाव शहरात भव्य क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून नागरिकांच्या हिताच्या कामांना निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन आमदार शेळके यांनी दिले. प्रतिष्ठानचे संस्थापक मयूर ढोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अबोली ढोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सातारा जिल्हा नियोजन सदस्य पदी रिपाईची नियुक्ती करावी : सुरेश येवले

सातारा दि: छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी आसलेल्या सातारा जिल्ह्यामध्ये समतेचा नारा देऊन सर्व समाजासाठी कार्यरत असणाऱ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया( रिपाई) या पक्षाचे नेते आदरणीय केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे. परंतु, सातारा जिल्हा नियोजन समितीवर एकाही कार्यकर्त्याला संधी देण्यात आलेली नाही. ही बाब राजकीय दृष्ट्या परवडणारी नसून त्वरित किमान दोन जागी रिपाई कार्यकर्त्यांना सातारा जिल्हा नियोजन मंडळावर संधी द्यावी .अशी रास्त मागणी रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते सुरेश येवले यांनी केलेले आहे.

सातारा जिल्ह्यात सर्व समाजाच्या न्याय हक्कासाठी विशेषता मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, भटक्या, विमुक्त जाती जमाती व अल्पसंख्याक समाजावर अन्याय झाला की, आदरणीय नेते रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक जिल्हा पातळीवरील नेते यांच्या आदेशानुसार अनेक आंदोलने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते व कार्यकर्ते करीत असतात . राजकीय दृष्ट्या भारतीय जनता पक्षाशी युती करण्यात आलेली आहे. आता शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व भारतीय जनता पक्षाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासोबत महायुती म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते सर्वच स्तरावर त्यांच्या भूमिकेचे स्वागत करत आहेत . होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत त्यांना विजयी करण्यासाठी खारीचा वाटा उचलत आहे . आज अनेक वर्षे भारतीय जनता पक्षाची केंद्र व राज्यातही सत्ता आलेली आहे. परंतु दुर्दैवाने राजकीय दिलेल्या शब्दांनुसार अद्यापही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाने दिलेल्या मतानुसार अजूनही सत्तेचा वाटा मिळालेला नाही.

# तुमची इच्छा असेल तर जबाबदारी स्वीकारु, उमेदवारीची ब्रेकिंग न्यूज लवकरच सांगण्याचे शाहू छत्रपतींचे संकेत

**कोल्हापूर :** तुमची सर्वांची इच्छा असेल तर मी जबाबदारी स्वीकारायला तयार आहे, असे सांगत शाहू छत्रपती यांनी मंगळवारी आपल्यालोकसभाउमेदवारीबाबत स्पष्टपणे संकेत दिले. येथे ते एका पुस्तक प्रकाशन समारंभात बोलत होते. त्यांच्या या वक्तव्याने ते लोकसभेच्या निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे मानले जात असून, त्यामुळे हीकोल्हापूरचीजागा काँग्रेसलाच मिळण्याची शक्यताही बळावली आहे.



मुंबईतही मंगळवारी दुपारी महाविकास आघाडीच्या बैठकीत याबाबत चर्चा झाल्याचे समजते. परंतु यामध्ये पक्ष आणि उमेदवार याबाबत अंतिम निर्णय झाला नसून आज बुधवारी पुन्हा आघाडीची बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले.

पत्रकार विजय पाटील यांच्या 'ब्रेकिंग न्यूज' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात पुस्तकाच्या नावाचा संदर्भ देत शाहू छत्रपती म्हणाले, तुम्ही ज्या ब्रेकिंग न्यूजची वाट पहात आहात ती फक्त ब्रेकिंग न्यूज नसेल. तर ती मोठी जबाबदारी आहे. तुमच्या सर्वांची इच्छा असेल तर मी कामासाठी नेहमी उपलब्ध आहे. ही ब्रेकिंग न्यूज ऐशआराम करण्यासाठी नसून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठीची असेल. आता ही प्रश्न सोडवले जात आहेत.

परंतु ते अधिक गतीने आणि व्यापक पद्धतीने सोडवण्यासाठी तुम्हा सर्वांचे मार्गदर्शन लागणार आहे. तुम्ही म्हणता तशी बातमी आलीच तर आपल्या आणखी एक, दोन बैठकाही होतील. मी तुमच्याशी संवाद साधेन. एकाचवेळी सर्व प्रश्न सुटणार नाहीत. परंतु त्यासाठीचा प्राधान्यक्रम आपल्याला ठरवावा लागेल.महाविकास आघाडीची आजही मुंबईत बैठक

मुंबईत मंगळवारी दुपारी एका हॉटेलवर महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली. नाना पटोले, बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, विनायक राऊत, संजय राऊत आदी नेते उपस्थित होते. पुन्हा या सर्वांची बुधवारी बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, कोल्हापुरातून उमेदवारी मिळावी यासाठी 'गोकुळ'चे संचालक चेतन नरके नेत्यांच्या भेटीगाठी घेत आहेत.

# साताऱ्यातील चाफळच्या ऐतिहासिक श्रीराम मंदिरातील घंटेची चोरी, एकजण ताब्यात

**कऱ्हाड (जि. सातारा) :** चाफळ (ता. पाटण) येथील ऐतिहासिक श्रीराम मंदिरातील सुमारे दहा किलो वजनाची पूर्वापार वापरात असलेली पितळी गोलाकार घंटा चोरीला गेली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी मंदिरातील सीसीटीव्हीच्या आधारे एकाला ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे. योगेश जयवंत शिंगाडे (रा. खोडद-अतीत, ता. सातारा) असे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्यांचे नाव आहे.

चाफळ येथील मंदिरात सुमारे दहा किलो वजनाची पितळी घंटा होती. ही घंटा दर तासांनी वेळेची सूचना देत होती. या घंटेचा आवाज परिसरातील गावात निनादतो. मात्र, रविवारी रात्री ही घंटा चोरीला गेली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याठिकाणी भेट दिली.



सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे या चोरीबाबत कसून चौकशी केली जात आहे. राम मंदिरात सुरक्षारक्षक असूनही चोरट्याने घंटा चोरून नेल्याने गावात उलटसुलट चर्चा सुरू आहे.